**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः29.10.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस
2. 288 मतदारसंघांसाठी कालपर्यंत 3259 उमेदवारांचे 4426 अर्ज दाखल
3. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी भरला उमेदवारी अर्ज

आणि

4. राज्याच्या विविध भागांमध्ये जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा

**उमेदवारी अर्ज**

राज्यात येत्या 20 नोव्हेंबरला होत असलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. विविध राजकीय पक्षांच्या दिग्गज उमेदवारांनी काल आपापल्या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले. अनेक उमेदवारांनी यावेळी मिरवणूक काढत शक्तिप्रदर्शन केलं. 288 मतदारसंघांसाठी कालपर्यंत 3259 उमेदवारांचे 4426 अर्ज दाखल झाले आहेत अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे उमेदवार एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढण्यात आलेल्या प्रचारफेरीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे सहभागी झाले होते. ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे संजय केळकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी, तर याच मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. कर्जत-जामखेड मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार रोहित पवार यांनी, शिर्डी विधानसभा मतदारसंघातून प्रभावती घोगरे यांनी तर राहुरी विधानसभा मतदारसंघातून प्राजक्त तनपुरे यांनी अर्ज दाखल केला. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून सुधीर मुनगंटीवार यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्याबरोबर माजी केंद्रीय मंत्री

फग्गनसिंह कुलस्ते, ज्येष्ठ भाजप नेते चंदनसिंह चंदेल उपस्थित होते. मुंबईतल्या माहीम मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार अमित ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते. तर, वांद्रे पूर्व मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे वरुण सरदेसाई यांनी अर्ज दाखल केला. प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि परिवर्तन महाशक्तीचे उमदेवार बच्चू कडू यांनी अचलपूर-चांदूरबाजार मतदारसंघातून अर्ज दाखल केला. नवी मुंबईतल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून, तर बेलापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संदीप नाईक नाईक यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार गजानन काळे यांनी देखील काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या सर्व उमेदवारांनी मिरवणूक काढत शक्ती प्रदर्शन केलं. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नितेश राणे यांनी कणकवलीतून, तर निलेश राणे यांनी कुडाळ मधून उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी खासदार नारायण राणे, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. सातारा-जावली विधानसभा मतदार संघातून भाजपतर्फे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, कराड दक्षिणमधून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसतर्फे, पाटण येथून शिवसेनेच्या वतीने पालकमंत्री शंभूराज देसाई, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं हर्षद कदम यांनी तर महाविकास आघाडीने तिकिट नाकारल्यानं सत्यजितसिंह पाटणकर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. जोगेश्वरी विधानसभा मतदारसंघातून, महायुतीतील शिवसेनेच्या उमेदवार मनिषा वायकर यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा खासदार रविंद्र वायकर, शिवसेनेचे जेष्ठ नेते आणि माजी खासदार गजानन कीर्तिकर आदी उपस्थित होते. रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूण विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार शेखर निकम यांनी, तर रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी शेखर निकम यांच्याबरोबर खासदार सुनील तटकरे उपस्थित होते. उमेदवारी अर्ज सादर करण्यापूर्वी बाळ माने यांनी शक्तिप्रदर्शन केलं. सांगली जिल्ह्यातील पलूस- कडेगाव विधानसभा मतदारसंघात आमदार विश्वजीत कदम यांनी काँग्रेस पक्षाकडून तर जत विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी कडून आमदार गोपीचंद पडळकर यांनी शक्ती प्रदर्शन करत काल उमेदवारी अर्ज दाखल केला. शिराळा विधानसभा मतदारसंघात भाजपाचे सत्यजित देशमुख आणि खानापूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून वैभव पाटील यांनी अर्ज दाखल केला.
नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी काल मालेगाव बाह्य मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. नाशिक शहर-पूर्व मतदार संघातून आमदार ॲडव्होकेट राहुल ढिकले, नाशिक मध्य विधानसभा मतदार संघातून आमदार देवयानी फरांदे, नाशिक पश्चीम मतदार संघातून आमदार सीमा हिरे या तिन्ही भाजप आमदारांनी, पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या उपस्थितीत अर्ज

दाखल केले.  नांदगाव मतदार संघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी खासदार समीर भुजबळ यांनी बंडखोरी करत  उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, कॉंग्रेसचे नेते माजी मंत्री अनिस अहमद यांनी काल वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. अहमद, नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यावेळी उपस्थित होते.

**पक्ष- यादी**
विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी काही तास शिल्लक असताना कालही विविध पक्षांनी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने काल सात उमेदवारांची यादी जाहीर केली. तर भारतीय जनता पक्षानं 25 उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपानं चार जागा मित्र पक्षांना देण्याची घोषणा केली आहे. शिवसेनेनं 15; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं 18 तर कॉंग्रेसनं राज्यातल्या विविध मतदार संघांसाठी चार उमेदवारांची काल घोषणा केली.

**नांदेड पोट निवडणुक**
नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने  डॉक्टर  संतुक हंबर्डे यांना उमेदवारी घोषित केली आहे. खासदार वसंतराव चव्हाण यांचं  निधन झाल्यामुळे नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत काँग्रेसने वसंतराव चव्हाण यांचे पुत्र प्रा. रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी घोषित केली आहे. रवींद्र चव्हाण यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

**रायगड- महेंद्र घरत**
रायगड जिल्ह्यातील सात विधानसभेपैकी, महाविकास आघाडीकडून काँग्रेस पक्षाला एकही उमेदवार न दिल्यामुळे  रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांनी काल आपल्या  पदाचा राजीनामा दिला आहे.

**मतदार जागृती**
पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघात सरासरी मतदानाचं प्रमाण कमी असल्याचं लोकसभा निवडणुकीत आढळून आल्यानं मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे नवमतदारांना मतदानाचं आवाहन करण्यात येत आहे. प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयात काल मतदान जनजागृतीचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये विद्यार्थ्यांना शंभर टक्के मतदानाची शपथ देण्यात आली. नवी मुंबईत ऐरोली इथल्या सेक्टर पाचमध्ये सरस्वती विद्यालयाच्या वतीनं जनजागृतीपर फेरी काढून नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं.

**राज्यपाल-शुभेच्छा**

दीपावलीच्या सणाचा राज्यभरात उत्साह आहे. काल वसूबारसेला गाय वासराची पूजा करण्यात आली. आज धनत्रयोदशीबरोबरच धन्वंतरी जयंतीही साजरी केली जात आहे. नववा आयुर्वेद दिनही आज साजरा होत आहे. जागतिक आरोग्यासाठी आयुर्वेदातील नवोन्मेष अशी यावर्षीच्या धन्वंतरी दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेला धनत्रयोदशी तसंच दीपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. दीपावलीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि सुख-शांती घेऊन येवो असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**मॉस्को- वैद्य पाटणकर**

मॉस्को इथल्या भारतीय दूतावासानं आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद दिवसाच्या सोहोळ्यामध्ये पुण्यातील वैद्य हरिश पाटणकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आलं आहे. मॉस्कोतील सर्वात मोठ्या वनस्पतीशास्त्रीय उद्यानामध्ये आज, धनत्रयोदशीच्या दिवशी हा सोहोळा होत आहे.

**एम टी डी सी सवलती**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळनं दिवाळीच्या सुटीत जास्तीतजास्त पर्यटक पर्यटनासाठी यावेत यासाठी विशेष सवलती जाहीर केल्या आहेत अशी माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक दीपक हरणे यांनी दिली. ज्येष्ठ नागरिकांसाठी 20 टक्के, शासकीय कर्मचाऱ्यांना आगाऊ नोंदणीसाठी 10 ते 20 टक्के तर, शालेय सहलींसाठी विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

**हवामान**

राज्यात उद्यापासून तीन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**